# कार्यालयात होतोय महिलांचा छळ

## लैंगिक छळ कायद्याबाबत जनजागृतीची गरज

**मुंबई : प्रतिनिधी**

कामाच्या ठिकाणी महिलांवरील अत्याचाराच्या घटना वाढू लागल्या आहेत. लैंगिक छळवणूक कायद्याबाबतच्या अपुऱ्या जनजागृतीमुळे कार्पोरेट कार्यालयात महिलांचा छळ होत आहे. दक्षिण मुंबईतील केवळ तीन टक्के संस्थांमध्ये महिलांच्या कामाच्या ठिकाणी सुरक्षिततेबाबत काळजी घेतलेली दिसते, अशी माहीती एका सर्वेक्षणातून उघडकीस आली आहे.

मुंबईतील व्यावसायिक केंद्र असलेल्या नरिमन पॉईंट येथे आणि आगामी व्यावसायिक केंद्र असलेला लोअर परळ येथेही कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ (प्रतिबंध, निर्बंध, निवारण) कायदा २०१३ ची पुर्तता कशी करावी याबाबत जनजागृतीच केलेली नाही.



**महिलांविरोधातील गुन्ह्यांच्या तक्रारी**

| वर्ष | तक्रारी |
| --- | --- |
| २०१२ | २,४४२७० |
| २०१३ | ३,०९५४६ |

कम्प्लायकरो सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड कंपनीचे संस्थापक विशाल केडिया यांनी प्रेसक्लब येथे झालेल्या पत्रकार परिषदेत ही माहीती दिली. कम्प्लायकरो या कंपन्या व संघटनांना कायद्याच्या तरतूदींची अंमलबजावणी आणि पूर्तता करण्यासाठी सहकार्य करण्यासाठी केलेल्या समुहाने हे सर्वेक्षण केले होते. हा समूह कठोर शिक्षांबाबत संस्थांना जाणीव करून देण्यासाठी प्रयत्न करतो.

अनेक लहान-मोठ्या संस्थांमध्ये महिलांच्या सुरक्षिततेसाठी असलेल्या कायद्याची उदासिनता पाहून आम्हाला धक्का बसला आहे, असे ते म्हणाले. सुरक्षेविषयीच्या कायद्याची पूर्तता न होणाऱ्या संस्थांमध्ये लैंगिक छळाच्या घटना होत असल्यास त्यामुळे त्यांच्यावर गंभीर परिणाम होवू शकतात. अशा व्यक्तींना दंड आणि तुरूंगवासासह त्यांना व्यवसाय कायमस्वरूपी बंद करावा लागू शकतो, असे केडिया म्हणाले.

लैंगिक छळाची एखादी घटना खाजगी टॅक्सी, बस, रेल्वे किंवा विमानतळ परिसरात घडल्यास आस्थापनेने बळीला खटला दाखल करण्यास मदत केली पाहिजे. आपल्याकडे ती कामाला नव्हती असे सांगून कोणीही स्वत:ची सुटका करुन घेऊ शकत नाही, असेही विशाल केडिया यांनी सांगितले.

महिलांवरील गुन्हे खासगी क्षेत्रात आणि कामाच्या ठिकाणीही मोठ्या प्रमाणावर वाढू लागले आहेत. भारतातील महिलांविरोधातील गुन्ह्यांच्या तक्रारी २०१३ साली २०१२ च्या तुलनेत २६.७ टक्क्यांनी वाढल्या असल्याचे नॅशनल क्राइम ब्युरोने नमूद केले आहे. मागील वर्षी महिलांवरील अत्याचाराचे ३०९५४६ गुन्हे पोलिसांत नोंदवण्यात आले होते. २०१२ साली हीच संख्या २४४२७० होती.